धुक्याने एक छान गोष्ट शिकवली की,
जीवनात रस्ता दिसत नसेल तर
दूरचं पाहण्याचा प्रयत्न करणं व्यर्थ असतं,
एक एक पाऊल टाकत चला,
रस्ता आपोआप मोकळा होत जाईल..!!

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १०२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२४ नोव्हेंबर २०२४


# अविश्वसनीय निकाल ! महाविकास आघाडी बेहाल !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने गेल्या सहा महिन्यांपासून राज्याच्या राजकीय वर्तुळात वातावरण तापलं होतं. महाविकास आघाडी व महायुती यांच्यात थेट झालेल्या लढाईत कोण बाजी मारणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. मतदानोत्तर चाचण्यांनी अंदाज वर्तवला होता की राज्यात अटीतटीची स्पर्धा होईल. तर काही चाचण्यांमधून त्रिशंकू स्थितीचा अंदाज वर्तवला होता. तीन चाचण्यांनी मविआच्या बाजूने कल दर्शवला होता. मात्र, सर्व राजकीय विश्लेषक, मतदानोत्तर चाचण्या चुकीच्या ठरवत महायुतीने तब्बल २३५ हून अधिक जागा जिंकल्या आहेत. रात्री आठ वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार २८८ पैकी २३६ जागांवर महायुती आघाडीवर आहे. तर महाविकास आघाडीला केवळ ४९ जागांवर आघाडी मिळाली आहे. महायुतीमध्ये भाजपाला १३७, शिवसेनेला (शिंदे) ५८, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला (अजित पवार) ४१ जागा मिळाल्या आहेत. तर, महाविकास आघाडीत शिवसेनेला (ठाकरे) २०, काँग्रेसला १५ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने १४ जागा जिंकल्या आहेत. अशा प्रकारचा निकाल कोणालाही अपेक्षित नव्हता. भाजता नेत्यांनी देखील १६० ते १७५ जागा मिळतील असाच अंदाज व्यक्त केला होता. मात्र महायुतीला २३५ हून अधिक जागा मिळाल्याने भाजपा व महायुतीतील नेत्यांना देखील आश्चर्य वाटलं आहे. भाजपा नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील अशाच प्रकारचं वक्तव्य केलं आहे.

**विधानसभेत १० मोठ्या नेत्यांचा पराभव...**

विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल आज (२३ नोव्हेंबर) रोजी जाहीर झाला. विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं तर महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. खरं तर ही विधानसभेची निवडणूक म हाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी



अटीतटीची होईल असं अनेकांना वाटलं होतं. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत उलट निकाल लागला आणि महाविकास आघाडीला धक्का बसला. एवढंच नाही तर काँग्रेस पक्षाच्या दिग्गज नेत्यांचा पराभव झाल्यामुळे दिग्गजांना धक्का बसला आहे.

**बाळासाहेब थोरातांचा पराभव**

विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात (इरश्ररीरहशल ढहेऑरीं) यांचा पराभव झाला आहे. संगमनेरमधून थोरात पराभूत झाले आहेत. ते आत्तापर्यंत त्यांनी आठवेळा निवडणूक लढवली होती आणि ते एकदाही हरले नव्हते. मात्र आता नवव्या वेळी त्यांचा पराभव झाला. काँग्रेससाठी हा मोठा धक्का मानला जातो.

**पृथ्वीराज चव्हाणांचा पराभव**

कराड दक्षिण विधानसभा म तदारसंघाचे काँग्रेसचे आमदार आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव झाला आहे. भाजपाचे डॉ. अतुलबाबा भोसले हे या मतदारसंघातून विजयी ठरले आहेत. महाविकास आघाडीची मोट बांधण्याकरता पृथ्वीराज चव्हाण आघाडीवर होते. तसंच, म हाविकास आघाडीची सत्ता आल्यास पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होऊ शकतील, अशी शक्यताही बांधली जात होती. परंतु, त्यांचा दारुण पराभव झाला आहे.

**यशोमती ठाकूर यांचा पराभव**

काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोम ती ठाकूर यांचा तिवसा विधानसभा म तदारसंघात पराभव झाला आहे. त्यांच्या विरोधात भाजपाचे राजेश वानखडे विजयी झाले आहेत. खरं तर राज्यातील दिग्गज काँग्रेस नेत्यांचा पराभव झाल्यामुळे काँग्रेसला धक्यावर धक्के बसले आहेत.

**धीरज देखमुखांचा पराभव**

काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या लातूर ग्रामीणमधून धीरज देखमुख यांचा पराभव झाला आहे. धीरज देखमुख यांच्यासाठी अभिनेता रितेश देशमुख यांचा प्रचार केला होता. मात्र, तरीही धीरज देखमुख यांचा पराभव झाल्यामुळे मोठा धक्का बसला.

**काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांचा पराभव**

विधानसभा निवडणूक २०२४ चा निकाल जाहीर झाला आहे. या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. यामध्ये कसबा पेठ मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव झाला आहे. त्यांच्या विरोधात भाजपाचे हेमंत रासने यांचा विजय झाला आहे.

**प्रहारचे बच्चू कडू यांचा पराभव**

आमदार बच्चू कडू यांचा अचलपूर विधानसभा मतदारसंघातून पराभव झाला आहे. त्यामुळे बच्चू कडू यांना मोठा धक्का बसला आहे. बच्चू कडू यांच्या विरोधातील महायुतीचे उमेदवार प्रविण तायडे विजयी झाले आहेत. बच्चू कडू यांनी परिवर्तन महाशक्तीच्या माध्यमातून महायुती आणि महाविकास आघाडीला आव्हान दिलं होतं.

**संजयकाका पाटील यांचा पराभव**

तासगाव-कवठे-महांकाळ विधानसभा मतदारसंघात सांगलीचे माजी खासदार संजयकाका पाटील यांचा पराभव झाला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर माजी खासदार संजयकाका पाटील यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षात प्रवेश केला होता. तसेच लोकसभेची निवडणूक त्यांनी भारतीय जनता पक्षाकडून लढवली होती. मात्र, त्यातही त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर आता विधानसभेच्या निवडणुकीतही संजयकाका पाटील यांचा पराभव झाला. या मतदारसंघात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे रोहित पाटील यांचा विजय झाला आहे.

**शशिकांत शिंदेंचा पराभव**

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे नेते शशिकांत शिंदे यांचा कोरेगाव मतदारसंघातून पराभव झाला आहे. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे महेश शिंदे हे विजयी झाले आहेत. महत्वाचं म्हणजे शशिकांत शिंदे यांनी सातारा लोकसभेची निवडणूक लढवली होती. या निवडणुकीतही शशिकांत शिंदे यांना पराभवाला सामोरं जावं लागलं होतं.

**राम सातपुतेंचा पराभव**

भारतीय जनता पक्षाचे आमदार राम सातपुते यांचा माळशिरस विधानसभा मतदारसंघामधून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे उत्तमराव जानकर यांनी पराभव केला. त्यामुळे आमदार राम सातपुते यांना मोठा धक्का बसला.

**ठाकरे कुटुंबातील पहिला पराभव**

दादर - माहीम विधानसभा म तदारसंघात होऊ घातलेल्या तिरंगी लढतीकडे सर्वांचे लक्ष होते. या म तदारसंघातून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे पहिल्यांदाच निवडणुकीला सामोरे गेले. त्यांना शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे महेश सावंत आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे विद्यमान आमदार सदा सरवणकर यांचे आव्हान होते. हे आव्हान त्यांना पेलवता आले नाही. कारण त्यांचे निवासस्थान असलेल्या या मतदारसंघातून त्यांचा दारूण पराभव झाला आहे.

## सुधीर मुनगंटीवार सलग सातव्यांदा विजयी !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, चंद्रपूर :** बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात भाजपा महायुतीचे उमेदवार, वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी २६ हजार मतांची आघाडी घेत दणदणीत विजय संपादन केला असून ते सातव्यांदा विधानसभेत पोहोचले आहे. सातव्यांदा विधानसभेत निवडून जाणारे ते एकमेव उमेदवार आहे.

**विजयाचा उंच आलेख !**

१९९५ मध्ये तत्कालीन चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातुन ५५ हजाराच्या वर मताधिक्य घेत विदर्भातून सर्वाधिक मतांनी निवडून येण्याचा बहुमान त्यांनी पटकाविला. त्यानंतर १९९९, २००४ पर्यंत सलग ते चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातून निवडून गेले व विजयाची हॅट्रिक त्यांनी केली. त्यानंतर मतदार संघ पुनर्रचनेनंतर त्यांनी शेजारच्या बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातुन निवडणूक लढली. या विधानसभा क्षेत्रातुन देखील त्यांनी विजयाची हॅट्रिक साधली. २००९, २०१४, २०१९ मध्ये मताधिक्याने निवडणूका त्यांनी जिंकल्या. २०१४ मध्ये राज्याच्या अर्थ व वनमंत्री पदाची धुरा त्यांनी सांभाळली. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यावर वने, सांस्कृतिक आणि मत्स्यव्यवसाय या खात्यांचे ते मंत्री ते झाले.







## पारनेरमध्ये लंकेंना धक्का ! काशिनाथ दाते झाले आमदार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघात चुरशीच्या लढतीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी १५३४ मतांनी विजय मिळवला आहे. तर खासदार निलेश लंके यांच्या पत्नी शरद पवार गटाच्या उमेदवार राणी लंके यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे खासदार निलेश लंके यांना मोठा धक्का बसला आहे. पारनेर मतदारसंघात सुरवातीला एकतर्फी वाटणारी निवडणूक शेवटच्या टप्प्यात प्रचंड चुरशीची झाली. दाते यांना लाडकी बहिण योजना फायद्याची ठरणार की लंके यांना मोहटादेवी दर्शन यात्रा तारणार? अशी चर्चा मतदार संघात सुरू होती. तर दाते यांना काहीशी आघाडी मिळत होती. तर त्यानंतरच्या फेरीत ती कमी होत होती. त्यामुळे १५ फेरी पासून ते थेट शेवटच्या२७ व्या फेरी पर्यंत काय होईल याची उत्सुकता कायम होती. अखेर २७ व्या फेरी अखेर दाते यांना २४०६ मतांची आघाडी मिळाली व त्यांचा विजय सुखकर झाला.

## माजी मंत्री राजेंद्र शिंगणेंचा धक्कादायक पराभव बुलढाण्यात संजय गायकवाड विजयी...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, बुलढाणा :** प्रचारापासून मतदान आणि मतमोजणीपर्यंत काट्याची दुरंगी लढत ठरलेल्या बुलढाणा विधानसभा मतदारसंघात अखेर शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड (महायुती) यांनी बाजी मारली आहे. त्यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या जयश्री शेळके यांचा ६६१ मतांनी पराभव करीत विजयश्री अक्षरशः खेचून आणली. मतांचे विभाजन आणि नामसाध्यर्म असलेल्या उमेदवाराने घेतलेली मते याचा शेळके यांना फटका बसल्याचे चित्र आहे.

आज शनिवारी, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजताच्या सुमारास तहसिल कार्यालयमागील निवडणूक विभागाच्या नवीन इमारतीत मतमोजणीला सुरुवात झाली. प्रारंभी पोस्टल मतांची मोजणी करण्यात आली. पोस्टलमध्ये शेळकेनी बाजी मारली असली तरी आमदार गायकवाड यांनी पाहिल्या फेरीत आघाडी घेतली. मात्र मतमोजणी एखाद्या सरपंच पदाच्या निवडणुकी सारखे चढ उतार दिसून आले. कधी गायकवाड यांना अल्प आघाडी तर कधी शेळके अल्प मतांनी पुढे असा खेळ सुरू राहिला. यामुळे अंतिम म्हणजे २५ व्या फेरी पर्यंत लढतीचा रोमांच कायम राहिला २४ व्या फेरीपर्यंत कोणाच्याही विजयाची खात्री नसल्याने २५ वी अंतिम फेरी निर्णायक ठरली. यात संजय गायकवाड यांनी बाजी मारली आणि ते सलग दुसऱ्यांदा आमदार झाले. महायुतीचे संजय गायकवाड यांना ९० हजार ४५७ मते मिळाली. आघाडीच्या जयश्री शेळके यांना ८८ हजार ९८४ मते मिळालीत.

**जयश्री शेळकेंच्या हार मध्ये 'जयश्री शेळकें'चा हातभार**

वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत वाघोदे यांना केवळ ७०८४ मते मिळाली असली तरी त्यांनी आमदार गायकवाड यांच्या विजयात आणि आघाडीच्या जयशी शेळके यांच्या पराभवात मोठा वाटा उचलला. लढतीत आघाडीच्या जयशी सुनील शेळके यांच्यासह जयश्री रवींद्र शेळके या देखील होत्या. नाम साधर्म्यचा देखील आघाडीला फटका बसला. याचे कारण जयशी रवींद्र शेळके यांना ६३८ मते मिळालीत.

रिंगणातील अन्य उमेदवारांमुळे झालेल्या मत विभाजनाचा जास्त फटका आघाडीला बसल्याचे मानले जात आहे. यामुळे अटीतटीची लढत, झुंज देऊनही तीन आकडी फरकाने झालेला पराभाव जयशी शेळके यांच्यासाठी न भरून निघणारी राजकीय जखम ठरली. यामुळे महाविकास आघाडीला देखील 'जोर का झटका धिरे से लगे' या धर्तीवर मोठा धक्का लागला आहे. दुसरीकडे या चुरशीच्या लढतीत तब्बल १६६० मते 'नोटा' ला मिळाली वा देण्यात आली.

**राजेंद्र शिंगणे यांचा नामुष्कीजनक पराभव...**

सत्तेचा अमरपट्टा घेऊन कुणीच आले नाही हा संदेश देत सिंदखेडराजा म तदारसंघातील मतदारांनी नव्या दमाच्या मनोज कायंदे (राष्ट्रवादी अजितदादा गट) यांना विजयी केले आहे. सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाची लढत आणि मतमोजणी देखील अत्यंत चुरशीची झाली. प्रारंभीच्या टप्प्यात तिसऱ्या क्रमांकावर राहिलेले मनोज कायंदे यांनी एकदम उसळी मारली असून त्यांचा विजय झाला आहे. डॉ. राजेंद्र शिंगणे यांना मात्र नामुष्कीजनक पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

## संपादकीय



### संविधान बचाव' आणि 'गद्दारी' कालबाह्य?

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजप-शिवसेना (शिंदे) -राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांची महायुती आणि काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांची महाविकास आघाडी यांच्यात खरी लढत झाली. सहा प्रमुख पक्ष आणि त्यांच्या दोन आघाड्यांमध्ये राजकीय सत्तेसाठी झालेल्या स्पर्धेत कोण कुठे आहे आणि कोणत्या पक्षाचा आहे, हेही कळेनासे झाले होते, म्हणून ही निवडणूक आगळीवेगळी होती. लोकसभा निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्रात सत्ताधाऱ्यांच्या विरोधात वातावरण तयार झाले होते. संविधान बचाव हे नाणे खणखणीत वाजले. त्याशिवाय महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत जी काही राजकीय उलथापालथ, फोडाफोडी झाली, ते राज्यातील जनतेला आवडले नव्हते, त्याचे प्रतिबिंब लोकसभा निवडणुकीच्या निकालात पाहायला मिळाले. त्याचा सत्ताधारी महायुतीला विशेषत: भाजपला मोठा फटका बसला, तर महाविकास आघाडीला फायदा झाला. त्यामुळे विधानसभा निवडणूकही आपण जिंकणार अशा आविर्भावात मविआचे नेते वावरले, पण प्रत्येक निवडणूक ही वेगळी असते, हा इतिहास आहे.

लोकसभा निवडणुकीत सर्व प्रकारची ताकद पणाला लावूनही पराभवाचे झटके बसलेल्या महायुतीने निवडणूक जाहीर होण्याच्या दोन महिने आधीच लोकानुनयी निर्णयांचा धडाकाच लावला. लाडकी बहीण, तीर्थदर्शन, जाती-पातींची महामंडळे आणि बरेच काही सत्तेच्या माध्यमातून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा महायुतीचा हा प्रयत्न लपून राहिला नाही. एकूण महायुतीने महाविकास आघाडीपुढे तगडे आव्हान उभे केले, असे प्रथमदर्शनी तरी चित्र उभे राहिले.

#### आघाडीपुढचे मुद्दे कोणते?

लोकसभेप्रमाणे या वेळीही महाविकास आघाडीने कसेबसे जागावाटपाचे जमवले. लोकसभेत आघाडीच्या बाजूने कौल देऊन फोडाफोडीच्या राजकारणाचा उबग आल्याचे मतदारांनी दाखवून दिले होते. परंतु विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीकडे कोणते मुद्दे होते? संविधान बचाव किंवा गद्दारीचे नाणे? वास्तविक लोकसभा निवडणुकीत संविधान वाचविण्याचा मुद्दा जेवढा चालला तेवढी उद्धव ठाकरेंची गद्दारीची भाषा मतदारांनी स्वीकारल्याचे दिसले नाही. शिवसेना शिंदे गटाचे सात खासदार निवडून आले आणि शिवसेना ठाकरे गटाचे नऊ खासदार विजयी झाले, फक्त दोनचा फरक. म्हणजेच गद्दारीचे नाणे फारसे चालले नाही. सुरुवातीला लोकांना त्यातही खासकरून शिवसेनेचे अनुयायी व समर्थक, सहानुभूतीदार वर्गाला शिवसेनेत पडलेली किंवा पाडलेली फूट आवडली नाही. दुसरे असे की, एखाद्या पक्षातील फुटीचा प्रश्न त्या पक्षाच्या नेतृत्वाचा असतो, जनता ती किती काळ आपल्या उराशी बाळगून बसणार? पक्षात फूट पडली, कुणी गद्दारी केली, हा प्रश्न उद्धव ठाकरेंचा आणि शरद पवार यांचा आहे, कारण त्या दोघांच्या पक्षात फूट पडलेली आहे. सर्वसामान्यांसाठी तो कायम स्वरूपी निवडणुकीतील विषय होऊ शकत नाही. तसे असते तर लोकसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाला हे यश मिळाले नसते. किंबहुना, काँग्रेसपेक्षा शिवसेना ठाकरे गटाच्या जागा अधिक निवडून आल्या असत्या, परंतु तसे घडलेले नाही, याचा अर्थ काय ? अर्थात पक्ष फोडाफोडी, सरकारांची पाडापाडी, राज्यपालपदाचा वारंवार झालेला दुरुपयोग, याविरोधात लोकशाहीवादी मतदारांची महायुतीच्या विरोधात, खासकरून भाजपच्या विरोधात दिलेली ती प्रतिक्रिया होती आणि तिचा फायदा महाविकास आघाडीला मिळाला.

#### लाडकी बहीण विरुद्ध महालक्ष्मी


पण विधानसभा निवडणूक प्रचारातही गद्दारांना धडा शिकविण्याच्या ज्या गर्जना केल्या गेल्या, त्या मतदारांना भावल्या असतील का, हा प्रश्न आहे. कारण लोकसभेनंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. नवे मुद्दे, नवी आव्हाने पुढे आली आहेत. त्यांचा मुकाबला महाविकास आघाडी कसा करणार हा प्रश्न आहे. महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेला महाविकास आघाडी विरोध करू शकली नाही. उलट महालक्ष्मीच्या नावाने महिलांना महिना तीन हजार रुपये देण्याच्या समांतर योजनेची घोषणा महाविकास आघाडीने केली. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुती पुन्हा सत्तेवर आल्यास लाडकी बहीण योजनेची रक्कम २१०० रुपये करणार अशी घोषणा केली. त्यामुळे महायुतीची लाडकी बहीण विरुद्ध महाविकास आघाडीची महालक्ष्मी योजना, अशी स्पर्धा निर्माण झाली. मथितार्थ असा की, लाडकी बहीण योजना हा निवडणूक जुमला आहे, अशी टीका करण्याची भूमिका महाविकास आघाडीला घेताच आली नाही.

# संशोधक वृत्ती: त्या अशाच का?

पूर्व बंगालमधील डाक्का जिल्ह्यातील राणीखल या खेडेगावात दि.३० नोव्हेंबर १८५८ रोजी जगदीशचंद्र बोस यांचा जन्म झाला. त्यांचे वडील भगवानचंद्र बसू हे सरकारी नोकरीत सब डिव्हिजनला ऑफिसर होते. त्या काळी इंग्रजीत जसे ठाकूरचे टागोर झाले, राय आडनावाचे रे झाले तसेच बसू आडनावाचे इंग्रजी स्पेलिंगप्रमाणे बोस झाले. त्यांचे घराणे हे बंगाल प्रांतातील एक खानदानी घराणे होते. त्यांची आई साध्वी व सुशील होती. लहानपणापासूनच जगदीशचंद्र आजूबाजूचा निसर्ग पहायचे व त्याचे निरीक्षण करायचे. निसर्गातील अनेक गोष्टी पाहून त्या अशाच का? असा प्रश्न त्यांना पडे. भगवानचंद्र सुद्धा न कंटाळता छोट्या जगदीशने विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देत असत. सर्व झाडे एकाच वेळी का फुले देत नाहीत? एखाद्या झाडाची पालवी पोपटी हिरवी पण दुसर्याची तांबूस असा फरक का पडतो? असे त्यांना वाटे. झाडे, फुले, फलपाखरे, भोवतीचा निसर्ग आदींचे निरीक्षण करणे, हा त्यांचा आवडता छंद होता.

डॉ.जगदीशचंद्र बोस हे कोलकाता येथील सेंट झेवियर शाळा आणि त्याच नावाच्या महाविद्यालयात शिकले. त्यानंतर इंग्लंडच्या ख्राईस्ट चर्च महाविद्यालयातून भौतिकी, रसायन वनस्पतिशास्त्र आणि निसर्गविज्ञानाचा अभ्यास पूर्ण करून ते भारतात परत आले. या काळात त्यांना भौतिकशास्त्रज्ञ लॉर्ड रॅली यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ.बोस यांनी लिहिलेली पुस्तके- इरिटेबिलिटी ऑफ प्लँट्स, इलेक्ट्रो-फिजिओलॉजी ऑफ प्लँट्स, ट्रॉपिक मुव्हमेण्ट अॅण्ड ग्रोथ ऑफ प्लँट्स, दि नव्हस मेकॅनिझम ऑफ प्लँट्स, प्लँट रिस्पॉन्स, दि फिजिऑलॉजी ऑफ फोटोसिंथेसिस, दि मोटार मेकॅनिझम ऑफ प्लँट्स, रिस्पॉन्सेस इन दि लिव्हिंग अॅण्ड नॉन लिव्हिंग, लाइफ मुव्हमेण्ट्स ऑफ प्लँट्स- भाग १ ते ४ आदींचा समावेश आहे.

विद्युतशक्तीवरील संशोधनानंतर ते वनस्पतिशास्त्राकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तूतील साम्य आणि भेद याचा त्यांनी अभ्यास केला. स्नायू, मज्जातंतू, सुखदु:ख आदी विकार यांचा वनस्पतीबाबत त्यांनी धांडोळा घेतला. डायामेट्रिकल कोन्ट्रॅक्शन अॅपरेटस, रेझोनंट रेकॉर्डर्स ही दोन उपकरणे तयार करुन त्यांनी त्यांच्या साहाय्याने थंडी, प्रकाश, विद्युत, उष्णता या घटकांचा वनस्पती व प्राणी यांच्यावरील परिणामांचा अभ्यास केला. वनस्पतींचे श्वसन, रुधिराभिसरण पद्धतीने होणारे त्यांच्यातील कार्य, अन्नाची ने-आण निरुपयोगी वस्तूंचा निचरा हे त्यांच्या संशोधनाचे विषय होते. वनस्पतीमध्ये होणार्या



सूक्ष्म बदलांची माहिती ठेवून त्याच्या नियमित नोंदी त्यांनी ठेवल्या. त्यावर संशोधन केले. त्यांच्या याच संशोधनातून वनस्पतींना संवेदना असतात हे त्यांनी सिद्ध केले. भारतीय वैज्ञानिक सोहिनी चक्रबोर्ती यांनी २०१६मध्ये प्रसिद्ध केलेल्या संशोधनातून ही प्रक्रिया उलगडून दाखविली आहे. वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी रेझोनंट रेकॉर्डर, ऑसिलेटिंग रेकॉर्डर, कंपाऊंड लेव्हलर, क्रेसकोग्राफ, बॅलिन्सिंग अॅपरेट्स आदी उपकरणे तयार केले. इंग्लंड व कोलकाता येथील प्रेसिडेन्सी महाविद्यालयात इ.स.१८८५ ते १९१५ अशी ३० वर्षे भौतिकशास्त्र विषय शिकवत असतानाच त्यांनी विद्युतशक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरंगांचा शोध घेऊन त्यांनी बॅटरी बनवली. या शोधाची कीर्ती सर्वदूर पसरली. प्रसिद्ध शास्त्रज्ञ पोइंकर आणि जे.जे. थॉम्पसन यांच्या लिखाणात या शोधाचा उल्लेख आला आहे. नेमेलाइटच्या मदतीने संदेश पाठवण्यात त्यांना यश मिळाले होते. इ.स. १८९६मध्ये रेडिओ संदेश वहनाचे प्रयोग मार्कोनीने केले तर त्याच्या एक वर्षाआधीच जगदीशचंद्रजींनी ते केले होते. हे आता अमेरिकेस मान्य करावे लागत आहे.

डॉ.सर जगदीशचंद्र बोस यांनी सन १९१७मध्ये कोलकाता येथे बोस रिसर्च इन्स्टिट्यूट नावाची संस्था स्थापन करून एक मुखपत्रही सुरू केले. त्यांचे वयाच्या ७९व्या वर्षी दि.२३ नोव्हेंबर १९३७ रोजी निधन झाले.

**!! त्यांच्या पावन स्मृतींना व संशोधनांना अदबीने मानाचा लवून मुजरा !!**

**श्री.एन. के.कुमार जी. (से.नि.प्रा.शिक्षक).**
**(प्रभावशाली थोर पुरुषांचे कार्याभ्यासक.)**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली.**
**मधुभाष- ७७७५०४१०८६.**

## राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड विजय

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२३, ठाणे :** राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड सलग चौथ्यांदा कळवा मुंब्रा मतदार संघातून विजयी झाले आहेत. सुमारे एक लाख मतांनी विजयी झाले आहेत. आव्हाड यांच्या विजयानंतर मतमोजणी केंद्राबाहेर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी ढोल ताशांच्या गजरात जल्लोष साजरा केला.

कळवा मुंब्रा मतदार संघातून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड हे मागील तीन टर्म या मतदारसंघात आमदार म्हणून निवडून येत होते. राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर जितेंद्र आव्हाड हे शरद पवार यांच्यासोबत कायम राहिले होते. तर नजीब मुल्ला, आनंद परांजपे हे अजित पवार यांच्यासोबत गेले होते. या मतदारसंघातून जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात नजीब मुल्ला यांनी निवडणूक लढवली होती. परंतु नजीब मुल्ला यांचा सुमारे एक लाख मतांनी पराभव झाला आहे. नजीब मुल्ला यांच्या पराभवानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मतमोजणी केंद्राबाहेर जल्लोष साजरा केला. फटाक्यांची आतषबाजी आणि ढोल ताशांच्या गजरात आव्हाड यांची मिरवणूक काढण्यात आली. आव्हाड हे या मतदारसंघातून आता चौथ्यांदा निवडून आले आहेत.

### पराजय...

भावना जागृत मना
नाही मातीचे गोळे
बदलू जातात चित्रे
उघडती जेंव्हा डोळे

असंतुष्ट जखडणारं
किती दिस बळेबळे
विस्फोट होई कधी
आंदोलन करे दुबळे

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

कळते महत्व यशाचे
जेंव्हा बुडाआग जळे
काजळी झटका मधे
तेंव्हा मशाली उजळे

भले येती ताळ्यावर
वेदना जिव्हारी छळे
जाणा खेळाचागाभा
जमलेला डाव उधळे

तळपता सूर्य सुध्दा
तो संध्यासमयी ढळे
रात्रीचे विश्रांती नंतर
फिटे अंधाराचे जाळे

पराजय शिक्षकासम
विजय महानता कळे
गृहीत धरून जनाला
होऊ नकात मोकळे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# भक्तांशी एकरूप झालेले प.पू. भक्तराज महाराज !

महाराष्ट्र ही अवतारांची आणि साधू संतांची भूमी. या भूमीत अनेक संत महात्मे होऊन गेले. त्यांनी दिलेल्या शिकवणीकीतून, प्रवचनांतून, लिहिलेल्या भजनांतून आणि ग्रंथातून बोध घेऊन अनेक अनुयायी निर्माण झाले. या अनुयायांनी समाजाला अध्यात्माची आणि साधनेची गोडी लावली. समाजमनावर नामाचे महत्व बिंबवले आणि मनुष्यजन्माचे सार्थक कसे करायचे हे जनमानसांत ठसवले. ज्यांनी हे महत्व समजून घेतले त्यांनी मनुष्यजन्माचा उद्धार करून घेतला. याच संतांच्या मांदियाळीतील एक संत म्हणजे प.पू. भक्तराज महाराज. संसारात राहून साधना कशी करावी आणि स्वत:चा उद्धार कसा करून घ्यावा याचे जिवंत उदाहरण म्हणजे प.पू. भक्तराज महाराज. प्रीतीचे सगुण रूप म्हणजे प.पू. भक्तराज महाराज, गुरुसेवेचा परमावधी म्हणजे प.पू. भक्तराज महाराज. अशा या भक्तराज महाराजांचा महानिर्वाण दिन कार्तिक कृष्ण नवमी म्हणजेच २४ नोव्हेंबर २०२४ या दिवशी पुण्यातील जुन्नर तालुक्यातील श्रीक्षेत्र कांदळी(वडगाव) येथे साजरा होत आहे. त्यानिमित्ताने बाबांच्या गुरुसेवेची आणि त्यांच्या कर्तृत्वाची थोडक्यात ओळख करून घेऊया.

बाबांचा (प.पू. भक्तराज महाराज यांचा) जन्म अत्यंत धार्मिक सामान्य ब्राह्मण प्रतिष्ठित कुळात झाला. श्रीराम हे त्यांचे कुलदैवत ! लहानपणापासूनच भगवत्प्रेमाने त्यांना आकर्षित केले. त्यांच्या हृदयात भक्तीज्योत सदैव तेवत राहिली, परिणामस्वरूप 'धार्मिक कार्यात सातत्याने भाग घेणे आणि भजन, श्रवण, गरिबांना साहाय्य करणे', हा त्यांचा आवडता छंद आणि स्वभाव बनला. शिक्षण पूर्ण होताच परिस्थितीवश त्यांनी नोकरी शोधण्याचे काम आरंभ केले. नोकरी मिळेपर्यंत स्वस्थ न बसता त्यांनी लहान-सहान कामे करून व्यवसाय वाढवला; पण नियतीला हे मान्य नव्हते. 'कुशाग्र बुद्धी, वाक्पटूता, त्वरित अचूक निर्णय घेणे', या गुणांमुळे हे बालक असामान्य झाले. यामुळे सगळेच त्यांच्याशी आदरभाव ठेवून वागत असत. त्यांची लहानपणापासूनच धार्मिक आणि आध्यात्मिक साधनेची वृत्ती असल्यामुळे त्यांना 'श्री गुरुचरित्र'वाचनाचा छंद जडला. विपत्तीकाळातही त्यांची साधना यथागत चालूच होती. त्यामुळे त्यांची गुरुप्राप्तीची ओढ दिवसेंदिवस वाढत गेली. त्याच दरम्यान प.पू. श्रीशामसाईबाबांनी (हे साईबाबांचे शिष्य होते आणि त्यांच्याच आदेशानुसार त्यांच्या मोरटक्का आश्रमात राहून जनसेवा करत होते.) बाबांना साईभक्ती वाढवण्यासाठी मार्गदर्शन करून



प्रोत्साहित केले. १५.२.१९५६ या दिवशी श्री अनंतानंद साईश यांनी बाबांना नर्मदामैय्याच्या साक्षीने गुरुमंत्र दिला. 'त्रैलोक्याचे योगीराज हे अवतरले भूवरी ।', असे बाबांनी एका भजनात त्यांच्या गुरूंना उद्देशून म्हटले आहे. ते भजन बाबांनाही लागू पडते. बाबा हे गृहस्थाश्रमी असूनही अंतस्थ योगीराजच होते ! साधक आणि भक्त यांचा उद्धार करण्यासाठी बाबा अवतरले. तो दिवस म्हणजे ७ जुलै १९२०. शिष्यावस्थेत असतांना 'गुरु' आणि गुरुपदावर असतांना 'भक्त', या २ शब्दांतच जणू बाबांचे सारे जीवन सामावले होते. शिष्य असतांना गुरु वहाणा न घालता बाहेर जायला निघाले की, लगेच त्यांच्या वहाणा काखेत धरून त्यांच्या पाठी अनवाणी चालणे, धावणे, धावताना पायात काटा रुतून पाय रक्तबंबाल झाला तरी त्याकडे दुर्लक्ष करणे, भजनांच्या कार्यक्रमात 'गुरूंनी उठण्यास सांगितले नाही'; म्हणून सलग ८ – १० घंटे भजने म्हणणे, गुरूंसमोर तासन्तास एका पायावर उभे राहून भजने म्हणणे, रात्री गुरूंच्या झोपण्याच्या वेळी त्यांनी 'थांब' म्हणेपर्यंत अखंडपणे त्यांचे पाय चेपत राहणे, यांसारख्या बाबांच्या गुरुसेवेला तोड नाही. बाबांनी अशा गुरुसेवेतून शिष्यत्वाचा मोठा आदर्शच आपल्या सर्वांसमोर ठेवला आहे.

प.पू. बाबा म्हणायचे, 'भजन हेच माझे जीवन आहे.' बाबांच्या भजनांचे वैशिष्ट्य हे की, आज इतक्या वर्षांनंतरही प्रत्येक साधकाला प्रत्येक प्रसंगात त्या भजनांतून त्याच्या साधनेसाठी आवश्यक असलेला अर्थ उलगडतो ! यासाठीच 'बाबांची भजने', हा अनमोल असा प्रासादिक ठेवाच आहे. बाबांनी भजनांच्या माध्यमातून केवळ भक्तीयोगाचीच नव्हे, तर नामसंकीर्तनयोग, कर्मयोग, ज्ञानयोग आदी साधनामार्गांचीही शिकवण दिली. भक्तांना सत्संग आणि आनंद मिळावा अन् त्यांना साधनेसाठी मार्गदर्शन व्हावे, यांसाठी ऊन-पाऊस, वादळ-वारा आदी कशाचीही पर्वा न करता आणि प्रसंगी आजारपण असतांनाही प.पू. बाबा अनेक किलोमीटर प्रवास करून भक्तांकडे जात असत. प.पू. बाबांच्या या चैतन्यदायी सहवासाच्या स्मृती आजही भक्तांना भावाने रोमांचित केल्याविना राहात नाहीत. बाबांच्या भजनाचे ऑडिओ आणि व्हिडीओ आजही उपलब्ध आहेत.

या भजनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे रचियेते, संगीतकार आणि गायक स्वत: बाबा असल्याने ही भजने चैतन्याने ओतप्रोत भरलेली आहेत. एकदा बाबांच्या गुरूंनी सर्वांना सांगितले, ''कल दिनू के यहा भंडारा है ।' (बाबांचे पूर्वाश्रमीचे नाव 'दिनकर' होते. तेव्हा अनेक जण त्यांना 'दिनू' असे संबोधत.) बाबा मनात म्हणाले, 'माझ्याकडे पैसे नाहीत आणि घरात भंडार्यासाठी लागणारे सामानही नाही. अशा वेळी भंडारा कसा करणार ?' तरी बाबांनी 'गुरु पाहून घेतील', असा विचार करून भंडारा करायचे ठरवले. गुरूंनी पुष्कळ जणांना भंडार्याचे निमंत्रण दिले. नंतर गुरूंच्या कृपेने भंडार्यासाठीच्या सामानाची सर्व सोय आपोआप झाली आणि भंडार्यात काही अल्पही पडले नाही. गुरूंनी घेतलेल्या परीक्षेत बाबा उत्तीर्ण झाले. पुढे बाबांनी जवळ विशेष पैसे नसतांनाही असंख्य भंडारे केले आणि भक्तांना शिकवले, 'गुरूंवर दृढ श्रद्धा ठेवा आणि गुरूंसाठी सर्वस्वाचा त्याग करा. मग पाहा, गुरु कृपा करतातच !' सर्वसाधारणत: थोर संत-माहात्मे हे जपजाप्य, ध्यानधारणा, समाधी आदींमध्ये व्यस्त राहतात आणि काही वेळ भक्तांना मार्गदर्शन करतात. बाबांना मात्र भक्तांविना चैनच पडायचे नाही, इतके ते भक्तांशी समरस झाले होते.

बहुतेक संत केवळ मार्गदर्शनाच्या माध्यमातून भक्तांना शिकवतात. बाबांच्या भक्तांना शिकवण्याच्या नानाविध पद्धती होत्या. ते मार्गदर्शनाच्या माध्यमातून तर शिकवतच; पण सहज वागण्या-बोलण्यातून, गमतीजमती करून, कधी रागावून, तर कधी शिव्या देऊनसुद्धा भक्तांना शिकवत. इतकेच नव्हे, तर कधी भक्तांनी चुका केल्या, तर बाबा त्यांना मारतही असत. असे असले, तरी भक्तांना त्यांच्या रागावण्यात आणि मारण्यात प्रेमाचा ओलावा आणि भक्तांच्या कल्याणाचीच तळमळ जाणवे. यासाठीच आजही बाबांचे नुसते स्मरण केले, तरी भक्तांचे नेत्र भावाश्रूंनी डबडबल्याविना राहत नाहीत.

**(संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)**
**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## निकोलेच्या विजयानंतर कार्यकर्त्यांचा पारंपारिक धुमशा नाच करत जल्लोष...

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२३, पालघर :** पालघर जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीचे निकाल अनपेक्षित पणे पुढे येत असताना डहाणू मतदार संघात महाविकास आघाडीचे माकपा उमेदवार विद्यमान आमदार विनोद निकोले व भाजपा चे विनोद मेढा यांच्यात अंतिम टप्प्यात चुरशी लढाई झाली होती. मतदानाच्या शेवटच्या दिवशी बविआ चे उमेदवार सुरेश पाडवी यांनी भाजपा चे मेढा यांना पाठींबा दिला होता. त्यामुळे त्यांचा फायदा मेढा यांना विजयामध्ये होईल असे अंदाज राजकीय वर्तुळातून वर्तवले जात होते. मात्र बविआ च्या कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार निकोले यांना पाठींबा देत एकनिष्ठता दाखवली. यांचा फायदा निकोले यांना झाला. निकालाच्या अंतिम फेरी पर्यंत निकोले आणि मेढा यांच्यात चुरस पाहायला मिळाली. जिल्ह्याच्या सर्व मतदार संघांचे निकाल आले असताना शेवटपर्यंत डहाणू मतदार संघाचे निकाल आला नसताना जिल्ह्यावाशियांचे संपूर्ण लक्ष डहाणू मतदार संघावर होते. शेवटच्या पाच ते सहाव्या फेरीत निकोले यांनी बाजी मारत आपली आघाडी कायम ठेवत अखेर ५ हजार १३३ मतांची आघाडी घेऊन एकूण १ लाख ४हजार ४३३इतके मते पडून विजयी झाले. त्यामुळे पुन्हा एकदा निकोले डहाणू गड राखण्यास यश आले आहे. निकोले यांच्या विजयामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष करत पालघर मधील पारंपारिक वाद्य धूमशा व तारपा यावर ठेका धरत विजयाचा गुलाल उधळला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## डहाणू मतदार संघाचा गड माकपा राखण्यास यश...
### अटीतटीच्या लढतीत निकोले यांचा विजय



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२३, पालघर :** पालघर जिल्ह्यात विधानसभेचे निकाल धक्कादायक समोर आले आहेत. पालघर जिल्ह्यातील विक्रम गड, वसई, नालासोपारा, बोईसर आदी मतदार संघात मातब्बर नेत्यांचा पराभव झाला असून महायुती आघाडीने पालघर जिल्ह्यात बाजी मारली आहे. मात्र म हाविकास आघाडीकडून माकपा चे डहाणू मतदार संघाचे आमदार कॉ.विनोद निकोले यांनी भाजपा चे उमेदवार विनोद मेढा यांना शेवटच्या फेऱ्या पर्यंत झुंज देत अखेर ५ हजार मतदान ठिकाणी विजय मिळवला आहे. त्यामुळे पालघर मध्ये एकमेव महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले आहेत. निकोले यांच्या विजयानंतर कार्यकर्त्यांसह मतदार संघात जल्लोष पाहायला मिळत आहे. कार्यकर्त्यांनी डहाणू मध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी करून पारंपारिक तुमच्या नाच करून आनंद व्यक्त केला.

## आचारसंहितेचा फायदा घेऊन भूमाफियांनी केले अनधिकृत बांधकाम

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२३, ठाणे :** शास्त्रीनगरच्या मोकळ्या जागेत शास्त्रीनगर वासीयांसाठी आरोग्य केंद्र व जेष्ठ नागरिक विश्रांती कट्टा या नियोजित कामांसाठी मुख्यमंत्र्यांकडून विशेष निधी मंजूर करण्यात आलेला आहे. या कामांचा कार्यादेश ही काढण्यात आलेला होता. परंतु आचारसंहिता असल्याने हे काम चालू होऊ शकले नव्हते. याचा फायदा घेऊन काही भुमाफीयांनी या मोकळ्या जागेत अनधिकृतपणे गाळे बांधल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या संदर्भातील तक्रार ठाणे महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते हणमंत जगदाळे यांनी सहायक आयुक्त यांच्याकडे केली आहे. हणमंत जगदाळे यांच्या माध्यम ातून या विकास कामांचा पाठपुरावा मुख्यमंत्र्यांकडे झालेला होता. त्यांच्याच विनंती व शिफारशी नुसार नागरिकांच्या सोयीसाठी ही कामे नियोजित आहेत. याबाबतच्या सर्व वस्तुस्थितीची माहिती देण्यासाठी येत्या २ - ३ दिवसात मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याची माहिती हणमंत जगदाळे यांनी दिली आहे. या ठिकाणी होऊ घातलेल्या बांधकामाला या ठिकाणच्या नागरीकांनी ही तीव्र विरोध दर्शवला असून महापालिका प्रशासनाकडून यावर तात्काळ कारवाई व्हावी. अशी मागणी या ठिकाणचे नागरिक करत आहेत.

## कोल्हापुरात कमळ फुलले...



**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.२३, पेठवडगाव (कोल्हापूर) :** विधानसभा निवडणुकीत कोल्हापूर जिल्ह्यात १० जागेवर महायुतीचे उमेदवार निवडून आलेले आहेत. तसेच महाविकास आघाडीला सपशेल पराभव पत्करावा लागलेला आहे. हातकणंगले तालुक्यातील पेठ वडगाव येथील नगरसेवक सागर भोसले यांनी विक्रमी मतदान त्यांच्या बूथवर दिले. या निवडणुकीत पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह ४ विद्यमान आपली जागा राखण्यात यशस्वी झालेले आहेत. सुजित मिंचेकर, उल्हास, सत्यजित यांना निवडणुकीत पुन्हा एकदा पराभवाचा सामना करावा लागलेला आहे. तसेच पेठ वडगावमध्ये डॉ.मिलिंद हिरवे, प्रविता सालपे, अविनाश तेली, संतोष ताईंगडे, डॉ.अभय यादव, डॉ.अशोक चौगुले, राजू कवठेकर, जगन्नाथ माने, बंडा गोंदकर, सुनिता पोळ, निर्मला सावर्डेकर, कमलेश शिरवडेकर, चंद्रशेखर वाडेकर, युवराज वाळवेकर, तय्यब कुरेशी, भाजपचे सर्व पदाधिकारी या सर्वांनी ताकद लावल्यामुळे अशोकराव माने यांचा विजय सोपा झाला.

## शिक्षक आमदार झाल्याचे मतदारांमध्ये आनंद
### विक्रमगडातून भाजपाचे हरिचंद्र भोये विजयी



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२३, जव्हार (पालघर) :** १२९ विक्रम गड मतदार संघातून भाजपाचे हरिचंद्र भोये (सर) यांना ४१ हजार ४०८ मतांनी विजयी झाले आहेत. तब्बल ४७ वर्षांनी जव्हारकरांना लाभला जव्हारचा आमदार शिक्षक आमदार झाल्याचे मतदारांत आनंद. भाजपाचे उमेदवार हरिचद्र भोये (सर) हे अरविंद आश्रम शाळेतील शिक्षक आहेत.

मात्र त्यांचा जनतेशी प्रामाणिकपणा पक्षाशी एकनिष्ठ, ह्यामुळेच हरिचंद्र भोये निवडून आल्याचे सांगितले. त्यांचे प्रतिस्पर्ध्यां राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे उमेदवार यापूर्वीचे आमदार सुनील भुसारा यांचा पराभव केल्याचा निकाल आला आहे. भाजपाचे उमेदवार निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार हरिचंद्र भोये हे विक्रमगड अरविंद आश्रम शाळेतील एक प्रामाणिक शिक्षक आणि त्यांनी या भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, रुग्णालय, शिक्षण, आरोग्य असा गोरगरिबांची अनेक कामे प्रामाणिकपणे कामे करीत येथील गोरगरिब जनतेने विधानसभेवर निवडून दिले आहे. भाजपाचे उमेदवार नवनिर्वाचित आमदार हरिचंद्र भोये हे विजयी मताधिक्याने झाल्याने जव्हार शहरात ढोल ताशांचा गजरात विजयाचा गुलाल उधळून भव्य मिरवणूक काढून आनंद घेतला.

ही भव्य मिरवणूक यशवंत नगर मोर्चा, पचबती नाका, गांधी चौक अशी रॅली काढून आनंद घेतला. यामुळे आमदार हरिच्रद भोये यांनी भव्य मिरवणूक काढून आनंद घेतला. यावेळी पालघर लोकसभा खासदार डॉ.हेमंत सवरा तसेच सर्व

महायुतीचे तालुका अध्यक्ष, उपाध्यक्ष, जि.प.सदस्य, पंचायत समिती सदस्य, सभापती, उपसभापती, सरपंच, नगरसेवक, तसेच सर्व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेसला मोठ्ठा धक्का; संगमनेरमध्ये बाळासाहेब थोरात पराभूत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, संगमनेर (अहिल्यानगर) :** दिनांक २३ नोव्हेंबर सकाळपासून महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला सुरुवात झाली. या निकालानुसार जनतेने महायुतीला बहुमत दिल्याचे समजत आहे. या सगळ्यामध्ये काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचा तर पराभव झालाच पण काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचादेखील धक्कादायक पराभव झाला आहे.



काँग्रेसचे मुख्यमंत्रीपदाच्या रेसमध्ये असलेले बाळासाहेब थोरात, शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार अमोल खताळ आणि मनसेकडून योगेश सूर्यवंशी निवडणुकीच्या रिंगणात होते. या निवडणुकीत बाळासाहेब थोरात यांचा अमोल खताळ यांच्याकडून पराभव झाला आहे. सहकाराचा बालेकिल्ला असणाऱ्या या मतदारसंघावर काँग्रेसची मजबूत पकड होती. मात्र आता हा मतदार संघ काँग्रेसच्या ताब्यातून गेला आहे. २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत बाळासाहेब थोरात यांनी शिवसेनेच्या साहेबराव नवले यांचा पराभव केला होता. या निवडणुकीत बाळासाहेब थोरात यांना १ लाख २५ हजार ३८० हजार मते मिळाली होती.

तर साहेबराव नवले यांना ६३ हजार १२८ मते मिळाली होती. आजवरच्या निवडणुकीतील सर्वाधिक ६४ टक्के मते थोरात यांना मिळाली होती. उत्तरोत्तर मताधिक्यामुळे थोरात यांचा गड अधिक मजबूत झाला होता. मात्र यंदाच्या निवडणुकीत काँग्रेसला आपला गड राखण्यात अपयश आले आहे.

# आमदार संग्राम जगताप यांची 'हॅटट्रिक'

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघात महायुती राष्ट्रीवादी काँग्रेसचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांनी महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अभिषेक कळम कर यांचा दणदणीत मतांनी पराभव केला आहे. ३९ हजार ६५० मताधिक्क्याने लीड घेत विजयी हॅटट्रिक आमदार संग्राम जगताप यांनी मारली आहे. पुन्हा एकदा संग्राम जगताप यांच्यावर नगरकरांनी विश्वास दाखविला आहे.

नगर शहर विधानसभा मतदारसंघात महायुतीचे आमदार संग्राम जगताप विरुद्ध महाविकास आघाडीचे अभिषेक कळमकर यांच्यात लढत झाली. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ही महाविकास आघाडीत उमेदवारीवर एकमत झाले नव्हते. उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे यांचा अर्ज निवणुकीच्या रिंगणात कायम राहिला. त्यानंतर गाडे यांनी कळमकर यांना पाठिंबा दिला. परंतु, मनधरणी करण्यासाठी दोन दिवसांचा वेळ गेला. तोपर्यंत आमदार संग्राम जगताप यांनी मतदार संघ पिंजून काढला होता. कळमकर यांच्या प्रचारात शिवसेना ठाकरे गट पूर्णपणे सक्रिय असल्याचे दिसून आले नाही.

मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासून आमदार संग्राम जगताप मताधिक्य घेतली. दरम्यान मुकुंदनगरमधील मतदान केंद्रावरील दोन फेऱ्यांमध्ये कळमकर यांना मताधिक्य मिळाले. त्या दोन फेऱ्यांमध्ये जगताप यांची मताधिक्य घटले. परंतु, पुन्हा जगताप यांनी प्रत्येक फ ेरीमध्ये मताधिक्य वाढत गेले. २२ व्या फेरी अखेर आमदार संग्राम जगताप यांना ३९ हजार ६५० मतांचे मताधिक्य होते.

जगताप यांना १ लाख १७ हजार ५५ मते मिळाले.



तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार अभिषेक कळमकर यांना ७८ हजार २५५ मिळाले.

नगर शहर विधानसभा मतदारसंघातील आमदार संग्राम जगताप यांच्या विजयाचा निकाल हाती येताच जगताप समर्थकांनी विजयी जल्लोष केला.

# लासलगावात महायुती, भुजबळ समर्थकांचा जल्लोष; ढोल-ताशाच्या गजरात गुलाल उधळला

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२३, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव येथे भुजबळ समर्थकांनी जल्लोष केला. गणेश नगर गणेश मंदिर येथे ढोल-ताशांच्या गजरात फटाके फोडून तसेच पेढे वाटप करून सर्वांनी आनंदोत्सव साजरा केला, आणि एकमेकांचे अभिनंदन केले.

मतदारसंघाचे महायुतीचे

उमेदवारमंत्री छगन भुजबळ यांना २६ हजार ४०० मतांनी विजयी घोषित करताच लासलगाव शहरातील राष्ट्रवादी व भाजप शिवसेनेसह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष केला. आमदार भुजबळ यांनी पाचव्यांदा विजयश्री खेचून आणली असून फटाके वाजवत एकमेकांना मिठाई वाटून आनंद व्यक्त केला.



यावेळी माजी आमदार कल्याणराव पाटील, माजी पं.समिती सदस्य डी. के जगताप, सुवर्णा जगताप, राजेंद्र चाफेकर, शेखर होळकर, रामनाथ शेजवळ, वाल्मीकराव गायकवाड, दत्तुलाल शर्मा, राजू राणा, बाळासाहेब होळकर, बालेश जाधव, बबन शिंदे, सोमनाथ गांगुर्डे, वसीम तांबोळी, तुकाराम गांगुर्डे, बापू लचके, कैलास केदारे, अनिल सोनवने, सतीश पवार, सुशील भोसले, भोलकाका पवार, राजू जाधव, मनीष चोपडा, लखन खलसे, अयाज शेख, शितल शिंदे, ज्योती शिंदे, रूपा केदारे, उषा कुमावत, रंजना शिंदे, शैलजा भावसार, सोनाली शिंदे, भारती महाले, योगिता आंबेकर, पूजा भावसार, सिंधू पल्हार आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महायुतीची लाडकी बहीण योजनामुळे या परिसरातील महिलांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला. त्यामुळे महिलांचा प्रचंड पाठिंबा मिळाला. या विजयामुळे आता लासलगाव येवला मतदारसंघातील लासलगाव सह परिसरातील ४६ गावातील विकास कामाला वेग येणार आहे. असे सुवर्णा जगताप यांनी नमूद केले. सकाळपासूनच कार्यकर्त्यांम ध्ये निवडणुकीच्या निकालाबाबत उत्सुकता होती. भुजबळांचा विजयी झाल्याचे समजताच शहरासह ग्रामीण भागात कार्यकर्त्यांनी आतषबाजी करून आनंद व्यक्त केला.

# शिंदेचे सुहास कांदे पुन्हा आमदार
## जिल्ह्यातील १५ पैकी १५ आमदारांना पुन्हा एकदा जनसेवेची संधी

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.२३, नांदगाव (नाशिक) :** संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. यात राज्याच्या सत्तेच्या चाव्या पुन्हा एकदा महायुतीच्या हातात गेल्या आहेत. त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील १५ विधानसभा मतदारसंघापैकी १५ विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली आहे.

नाशिक जिल्ह्यातील महायुतीमधील शिंदे गटाचे आम दार सुहास अण्णा कांदे यांनी पुन्हा एकदा बाजी मारली आहे. तब्बल ८० हजार मतांनी नांदगाव विधानसभा मतदारसंघातून ते विजयी झाले. यावेळी मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी आमदार निवासस्थानी विजयाचा जल्लोष



साजरा केला. तसेच अजित दादा पवारांच्या राष्ट्रवादीकडून येवला विधानसभा मतदारसंघातून छगन भुजबळ यांनी पुन्हा एकदा निवडून येण्याचा पराक्रम केला आहे.

छगन भुजबळ हे २६ हजार मतांनी विजयी झाले आहेत. तर दिंडोरीतून नरहरी झिरवाळ तब्बल ४१ हजार मतांनी निवडून आले आहेत. तसेच देवळाली विधानसभा मतदारसंघातून सरोज अहिरे ४० हजार मतांनी विजयी झाल्या आहेत. इगतपुरीतून हिरामण खोसकर ८६ हजार मतांनी निवडून आले आहेत. तसेच कळवणमधून नितीन पवार ८ हजार तर सिन्नर मतदारसंघातून माणिकराव कोकाटे ४० हजार मतांनी निवडून आले आहेत. तर निफाडमधून दिलीप काका बनकर हे २८ हजार मतांनी विजयी झाले आहेत. तसेच महायुतीमधील भाजपकडून नाशिक पश्चिम मतदारसंघातून सीमा हिरे या ७० हजार मतांनी, नाशिक मध्यतून देवयानी फरांदे १७ हजार मतांनी, चांदवडमधून डॉ.राहुल आहेर ४८ हजार मतांनी, बागलाणमधून दिलीप बोरसे १ लाख २९ हजार ६३८ मतांनी आणि नाशिक पूर्वतून राहुल ढिकले ७० हजार मतांनी विजयी झाले आहेत. तर शिंदेंच्या शिवसेनेचे दादा भुसे हे मालेगाव बाह्य मतदारसंघातून १ लाखाहून अधिक मतांनी निवडून आले आहेत. याशिवाय मालेगाव मध्यतून एमआयएमचे मोहम्मद मुफ्ती इस्माईल हे ८५ मतांनी विजयी झाले आहेत.

# शेवटी लाडकी बहीणंच ठरली विजयाची शिल्पकार

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२४, सुपा (अहिल्यानगर) :** विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पारनेर, नगर मतदारसंघात पारनेर तालुका माहीती सेवा समितीचा अहवाल सादर करतांना समिती प्रवक्ते पत्रकार राजकुमार इकडे यांनी दैनिक अक्षराज, दैनिक लोकमंथन दैनिकामध्ये स्पष्ट नमूद केले होते. लाडकी बहीणंच ओवाळणार महायुतीला ! आणि शेवटी तेच आजच्या निवडनुकीच्या मतमोजणी मधे स्पष्ट उघड झाले हे नाकारता येत नाही. पाठीमागे अनेक निवडनुका झाल्या परंतु समितीच्या चौकशी अहवालात पुर्वी झालेल्या एकुन मतदानाच्या टक्केवारी मध्ये ४ ते ५ टक्यांनी वाढ झालेली दिसते, ही वस्तुस्थिती आहे. लाडक्या बहीणीचं मताने वाढ झालेली आहे. कारण ग्रामीण भागात गरीब, हातावर पोट भरणार्या, दररोज मोल मजुरी करणार्या भगिनी आपली रोजीरोटीची रोजंनदारी सोडुन मतदानाला फाटा देत होत्या. परंतु लाडक्या बहीण योजनेमुळे ओवाळणी स्वरुपात गेल्या सरकारने कायमस्वरुपी ओवाळणी दिल्याने लाडक्या बहीणीची खात्री झाल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक बहीणीने महायुतीचे पारनेर नगर मतदार संघातील विधान सभेचे उमेदवार काशिनाथ दाते (सर) या उमेदवाराला मत देण्याचा हक्क बजावित मतदान केले आणि आज महायुतीच्या प्रत्येक उमेदवाराला ह्या लाडक्या बहीणीने मतदान केल्याने आजच्या विधानसभेच्या निकालावरून स्पष्ट होते.

# माढा मतदारसंघातून धपका किंग पाटील विजयी; समर्थकांचा जल्लोष

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२३, पंढरपूर :** संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेल्या माढा विधानसभा मतदारसंघात कोण बाजी मारणार याची सर्वत्र चर्चा सुरु होती. याठिकाणी प्रस्थापितांना जबरदस्त फाईट देत महाविकास आघाडीकडून निवडणूक रिंगणात असलेले राष्ट्रवादी (श.प) गटाचे उमेदवार धपका किंग अभिजीत पाटील यांनी अपक्ष उमेदवार रणजीतसिंह शिंदे यांचा ३० हजारहून अधिक मतांनी पराभव केल्यानंतर माढ्यासह पंढरपूर तालुक्यातील पाटील समर्थकांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा केला.

सोलापूर जिल्ह्यात माढा मतदारसंघातील लढत ही अत्यंत अटीतटीची मानली जात होती. कारण माढ्यात तिरंगी लढत होती. यामध्ये माढ्याचे विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजित शिंदे निवडणूक लढवत होते. तर त्यांच्या विरोधात शरद पवार गटाचे अभिजीत पाटील तर महायुतीकडून अजित पवार गटाच्या मिनल साठे निवडणूक लढवत होत्या. या माढा विधानसभा मतदारसंघात माढा तालुक्यातील ७८, पंढरपूर तालुक्यातील ४२ तर माळशिरस तालुक्यातील १४ गावे आहेत.

याठिकाणी अभिजीत पाटील यांच्यासाठी शरद पवार यांच्यासह दिग्गज नेत्यांनी सभा घेतल्या होत्या. त्याचा मोठा फायदा अभिजीत पाटील यांना झाल्याचे दिसत आहे. दुसरीकडे आमदार बबनदादा शिंदे यांनी राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर अजित पवार यांच्यासोबत जाणे पसंत केले होते. त्यानंतर विधानसभेच्या निवडणुकीत पुत्र रणजित शिंदे यांना अपक्ष निवड़णुकीत उभे केले. त्यामुळं अजित पवार यांनी काँग्रेसच्या मिनल साठे यांनी तिकीट दिले होते.

**जिथून विठ्ठलाच्या परिवर्तनाची सुरुवात तिथून विधानसभेची मुहूर्तमेढ**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या परिवर्तनाची जिथून सुरुवात झाली. त्या तुंगत गावामध्ये विधानसभेची देखील मुहूर्तमेढ रोवत. महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांनी पहिली प्रचारसभा तुंगत येथे घेतली होती. यामुळे त्यांचे विजयात तुंगत येथील सभा लकी मानली जात आहे. सामान्य शेतकरी कुटुंबातील नेतृत्वावर विश्वास ठेवत मतदारांनी मोठे मताधिक्य देऊन माढा मतदारसंघात परिवर्तन घडवून आणले आहे. तुंगत याठिकाणी अभिजीत पाटील समर्थकांनी गुलालाची उधळण आणि फटाक्याची आतिषबाजी करुन जल्लोष साजरा केला. यावेळी संचालक विठ्ठलनाना रणदिवे, राजाभाऊ रणदिवे, अमित साळुंखे, पंकज लामकाने, ताज मुलाणी, औदुंबर गायकवाड, बाजीराव गायकवाड, शिवाजी नागणे, धनाजी मोरे,आदीसह समर्थक उपस्थित होते.

# संजय बनसोडे यांचा दणदणीत विजय

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२३, उदगीर (लातूर) :** उदगीर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी तब्बल १ लाख ४९हजार ७६६ मतदान घेत, आपले प्रतिस्पर्धी

उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे सुधाकर भालेराव यांचा तब्बल ९२ हजार ६१ मताधिक्याने दणदणीत पराभव केला आहे. उदगीर विधानसभा मतदारसंघासाठी दोन लाख १६ हजार मतदारांनी आपला हक्क बजावला होता.

सर्व मतदारांनी ना.संजय बनसोडे यांच्या विकास कामाची आणि त्यांच्या



दांडग्या जनसंपर्काची पावती देत त्यांना प्रचंड बहुमताने विजयी केले आहे. उदगीर विधानसभा मतदारसंघात १३ उमेदवार आपले भवितव्य आजमावत होते. मात्र दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस मध्येच लढत होईल, हे चित्र कायम राहिले होते. मात्र शेवटच्या टप्प्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची यंत्रणा ढासाळली, त्यात काँग्रेसचे अनेक नेते ना संजय बनसोडे यांच्या सोबत गेले. अनेकांनी पक्षप्रवेश केला. त्यामुळे महाविकास आघाडीची प्रचार यंत्रणा गडगडली असे म्हटले तर वावगे होणार नाही. वंचित चे उमेदवार शिवाजी देवनाळे यांना केवळ ८८४ मतदान मिळाले तर नोटाला ९७८ मतदान मिळाले.

राज्यात बोटावर मोजण्या इतक्या नेत्यांनी मोठे मताधिक्य घेतले आहे त्यामध्ये ना. संजय बनसोडे हे अग्रणी आहेत त्या मोठ्या विजयानंतर त्यांनी जनतेशी संवाद साधताना हा विजय माझ्या विकास कामाचा आणि जनतेचा आहे जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे त्या विश्वासाला मी पात्र रहीम आणि भविष्यातही जनतेच्या विकास कामासाठी सदैव तत्पर राहील असा विश्वास दाखवला आहे.

तसेच हा विजय जनतेला समर्पित केला आहे ही निवडणूक जनतेने हातात घेतल्यामुळे मला इतके जास्त मताधिक्य मिळाले आहे मी जनतेचा कायम ऋणी राहणार आहे असेही त्यांनी सांगितले आहे.

# शंभुराज देसाई यांच्या विजयाने पाटण मतदार संघात जल्लोष...

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२३, पाटण (सातारा) :** राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या २६१ पाटण विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत आज झालेल्या मतमोजणीत शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार राज्याचे मंत्री शंभुराज शिवाजीराव देसाई यांनी ३४ हजार ८२४ मताधिक्य घेत त्यांचे प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवार सत्यजितसिंह विक्रमसिंह पाटणकर यांना पराभव केले.

तर शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार भानुप्रताप उर्फ हर्षद मोहनराव कदम यांना तिसऱ्या क्रमांकाची केवळ ९ हजार ६२६ मते पडली आहेत. शंभुराज देसाई यांना एकूण १ लाख २५ हजार ७५९ तर सत्यजितसिंह पाटणकर यांना एकूण ९० हजार ९३५ मते पडली. तर इतर ८ उमेदवारांना ८८ ते १ हजार ३२८ या दरम्यान मतांनी गुंडाळले गेले. या विजयाने देसाई समर्थकांनी पाटण मतदार संघात विजयी जल्लोष साजरा करण्यास सुरुवात केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह पाटण येथे सकाळी ८ वा पासून सुरु झालेल्या विधानसभा निवडणुक मतमोजणीत एवीएम मशीनच्य-१८ टेबलवरुन २४ फेऱ्या, पोस्टल मतदानासाठी ७ टेबलवर तर सैनिक मतदान ३ टेबलवर हा निकाल मोजण्यात आला. निकाल ऐकण्यासाठी सर्व उमेदवारांच्या समर्थक, कार्यकर्त्यांनी मतमोजणी केंद्राबाहेर चारही बाजूंनी गर्दी केली होती. जसजस्या फेऱ्यांचा निकाल बाहेर समजत होता तसे कार्यकर्ते समर्थकांची गर्दी पाटण शहर व मतमोजणी केंद्राबाहेर वाढत होती. निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर पाटण शहरात व मतमोजणी केंद्राबाहेर ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या निवडणुकीत उमेदवारांना एवीएम मशीनवर पडलेली मते अधिक पोस्टल शिवसेना शिंदे गट शंभुराज शिवाजीराव देसाई- एवीएम- १,२४,८४१ + पोस्टल- ९१८ एकूण- १,२५,७५९, अपक्ष सत्यजितसिंह विक्रमसिंह पाटणकर एवीएम- ९०,००९ + पोस्टल ९२६ एकूण- ९०,९३५, शिवसेना ठाकरे गट भानुप्रताप उर्फ हर्षद मोहनराव कदम एवीएम- ९५१६ + पोस्टल- ११० एकूण- ९,६२६, महेश दिलीप चव्हाण एवीएम- ४४७, बाळासो रामचंद्र जगताप एवीएम- ५३५, विकास पांडुरंग कांबळे - २६०, विकास संभाजी कदम- ८८, प्रताप किसन मस्कर- २६७, संतोष रघुनाथ यादव- १२९६,विजय जयसिंग पाटणकर- ३४७, सुरज उत्तम पाटणकर- ५४९, नोटा- १३२८ असे मतदान झाले आहे. निकालाअंती विजयी उमेदवार शंभुराज देसाई यांना निवडणूक निर्णय अधिकारी सोपान टोम्पे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अनंत गुरव, निवडणूक निरीक्षक आदी उपस्थित होते.

**विजयी मिरवणूकीने पोलिसांच्यावर तणाव**



विजयी उमेदवार शंभुराज देसाई यांच्या समर्थकांनी मतमोजणी केंद्रापासून गुलालाची उधळण, फटाक्यांची आतिषबाजी करत व डीजेच्या तालावर विजयी मिरवणूक काढण्यास सुरुवात केली. ही मिरवणूक पाटणकर यांच्या निवासस्थानी समोर आली असता देसाई समर्थकांचा जल्लोष वाढला, दुसरीकडे पाटणकर समर्थक वाड्याच्या पायऱ्यांवर गर्दीने उभे होते.

दोन्ही समर्थकांच्या मध्ये पोलिसांनी पोलिस गाड्या लावून, स्वतः पोलिस जवानांनी कडे उभे केले होते. वाड्याजवळ मिरवणूक येताच शंभुराज देसाई यांनी समर्थकांच्यात चालत येवून गर्दीला पुढे जाण्याचे आवाहन केले. यावेळी पोलिसांच्यावर आलेला तणाव स्पष्ट दिसत होता.

**विकासकामाला जनतेने कौल दिला- शंभुराज देसाई**

गेल्या ५ वर्षात मतदार संघात राबविलेले विकास कामे मतदारांच्या पर्यंत पोहचविण्यास आम्ही यशस्वी झालो. जनतेने मतदार संघात झालेल्या विकासकामाला मतदान केले आहे. येथून पुढे देखील निवडणूक जाहीरनाम्यात दिलेली सर्व कामे मार्गी लावणार आहे. हा विजय माझ्या एकट्याचा नसून मतदार संघातील जनतेचा आहे. असे त्यांनी सांगितले.

**निकालाचे आत्मपरीक्षण करुन पुन्हा जोमाने कामाला लागणार- सत्यजितसिंह पाटणकर**

या विधानसभा निवडणुकीचा निकाल राज्यात सगळीकडेच धक्कादायक आहे. असा निकाल लागणे अपेक्षित नाही. या निकालाने पुन्हा एवीएम मशीनवर शंका उपलब्ध केली जात आहे. लाडक्या बहिणीचा इफेक्ट एवढ्या मोठ्या प्रमाणात पडणार नाही. मात्तबर नेत्यांचा पराभव अनेक ठिकाणी झाला आहे. पाटण मतदार संघात या निकालाने आत्म परीक्षण करु कार्यकर्त्यांनी व मतदारांनी खचून जावू नये, पुन्हा जोमाने कामाला लागू असे सत्यजितसिंह पाटणकर यांनी सांगितले.

# रवींद्र चव्हाण यांनी डोंबिवलीत भाजपचा गड राखला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, डोंबिवली (ठाणे) :** मागील १५ वर्ष डोंबिवली शहरावर आपली हुकमत कायम ठेवणाऱ्या भाजपचे आमदार रवींद्र चव्हाण यांनी यंदा चौथ्यांदा ७६ हजार ८९६ मताधिक्य मिळवून डोंबिवली शहरावरील स्वतासह भाजपचे वर्चस्व कायम ठेवले.

लोकसभा निवडणुकीपर्यंत एका व्यासपीठावर फिरणारे आणि एकमेकांचे गुणगान गाणारे महायुतीमधील मंत्री रवींद्र चव्हाण, माजी सभापती दीपेश म्हात्रे



विधानसभा निवडणुकीत एकमेकांचे प्रतिस्पर्धी झाले. नागरी समस्या, विकास कामांच्या विषयावर विविध प्रश्न उपस्थित करून म्हात्रे यांनी चव्हाण यांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला. परंतु, १५ वर्ष डोंबिवली शहरात आपली मतदारांपर्यंत पाळेमुळे घट्ट रोवलेल्या चव्हाण यांनी दीपेश यांचे आव्हान मोडून काढत शहरावरील आपले नेतृत्व कायम ठेवण्याची परंपरा अबाधित ठेवली.

आपला विजय हा एका विचारधारेचा, महायुतीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या एकजुटीचा, लाडक्या बहिणींनी दिलेल्या साथीचा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या विकासाचा विजय असल्याची प्रतिक्रिया सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी विजयानंतर माध्यमांना दिली. चव्हाण यांना एक लाख २३ हजार ४२७, तर दीपेश यांना ४६ हजार ५३१ मिळाली. विजयानंतर मंत्री चव्हाण यांची कार्यकर्त्यांनी सावळाराम क्रीडासंकुल ते गणेश मंदिर भव्य मिरवणुक काढली.

डोंबिवली विधानसभेचा उमेदवार, भाजपचा स्टार प्रचारक आणि स्वताच्या डोंबिवली मतदार संघाबरोबर पालघरसह कोकणातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचाराची जबाबदारी मंत्री चव्हाण यांच्यावर होती.

# थोडक्यात

## वणी विधानसभेच्या निवडणुकीत संजय देरकर विजयी



**अक्षराज : राजू गागरे**

**दि.२३, झरी (यवतमाळ) :** २०२४ विधानसभेच्या निकालाकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. संपूर्ण महाराष्ट्र राज्याचा कल महायुतीकडे असतांना मात्र वणी विधानसभेच्या निवडणुकीत संजय देरकर (उबाठा) चे निवडून आले आहे. मागील अनेक वेळा निवडणुकीत सजय देरकर यांना पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र यावेळी दणदणीत विजय मिळवता आला. संजय देरकर

यांना ९४ हजार ६१८ मते मिळाली तर भाजप चे संजीव रेड्डी बोदकुरवार यांना ७९०५८ इतकी मते मिळवीण्यापर्यंत मजल मारता आली. या निवडणुकीतील मनसेचे उमेदवार राजू उंबरकर यांना मागिल निवडणुकीपेक्षा अधिक म्हणजे २१ हजार ९७७ मतांचा पल्ला गाठता आला. तसेच संजय खाडे या निवडणुकीतील अपक्ष उमेदवार ज्यांच्या मतांच्या आकड्याकडेसर्वांच्याच नजरा लागल्या होत्या. मात्र संजय खाडे अपक्ष उमेदवार यांना साधा ८ हजारांचा पल्ला गाठता आला नाही. या निवडणुकीचा निकाल पाहता महाविकास आघाडी आणि महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना ७५ हजार पेक्षा अधिक मते मिळतील असे कुणालाच वाटले नसेल. कारण या निवडणुकीत अपक्ष असलेले उमेदवार संजय खाडे यांना मिळालेल्या मतांची आकडेवारी पाहता फक्त ७ हजार ५४० इतका कमी आकडा त्यांना गाठता आल्याचे दिसून येते. कदाचित त्यामुळेच सजय देरकर यांना १५ हजार पेक्षा अधिक मताची लीड घेता आली. अंदाज लावता येईल. संजय देरकर यांच्या दनदणीतमिळवीलेल्याऐतिहासिक विजयाने संजीव रेड्डी बोदकुरवार यांचे विजयाची हॅट्रिक मारण्याचे स्वप्न भंगले.

## नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार रविंद्र चव्हाण विजयी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नांदेड :** नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेसचे उमेदवार रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टीचे उमेदवार डॉ.संतुकराव मारोतराव हंबर्डे यांचा १ हजार ४५७ मतांनी पराभव केला आहे. ६ महिन्यापूर्वी काँग्रेसचे खासदार वसंतराव चव्हाण यांचे निधन झाल्यामुळे ही जागा रिक्त झाली होती. त्यांचे चिरंजीव रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी चुरशीच्या लढतीत ही जागा कायम ठेवली आहे.

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या पोटनिवडणुकीमध्ये केरळमधील वायनाड व महाराष्ट्रातील नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीची घोषणा करण्यात आली होती. २५ वर्षानंतर नांदेड येथे एकाचवेळी लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्यात. त्यामुळे या निवडणुकीत मोठ्या संख्येने मतदान झाले. गेल्यावेळी ६१ टक्के मतदान झालेल्या लोकसभेमध्ये पोटनिवडणुकीत ६७.८१ टक्के मतदान झाले. शेवटच्या काही फेऱ्यामध्ये त्यांनी मताधिक्य मिळवत ही जागा काँग्रेसकडे कायम ठेवली. रविंद्र चव्हाण यांना ५ लाख ८६ हजार ७८८ मते मिळाली तर डॉ.संतुकराव हंबर्डे यांना ५ लाख ८५ हजार ३३१ मते मिळाली. तिसऱ्या क्रमांकावर वंचित बहुजन आघाडीचे अविनाश विश्वनाथ भोसीकर यांना ८० हजार १७९ मते मिळाली.

## शिंदे सेनेचे विश्वनाथ भोईर कल्याण पश्चिम मधून कायम...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, ठाणे :** खडतर आव्हान उभे राहिलेल्या भोईर यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या तगड्या साथीमुळे भोईर यांचा कल्याण पश्चिमेतील मार्ग सुकर झाला. यापूर्वीच्या सत्रात कोणाच्याही ध्यानीमनी नसताना एक समझोत्याचा उमेदवार म्हणून उमेदवारी पदरात पडलेले विश्वनाथ भोईर पुन्हा कल्याण पश्चिमेतील शिवसेनेची जागा कायम ठेऊन या भागाचे नेतृत्व करण्यास सज्ज झाले आहेत.

मागील ५ ते १० वर्षापासून कल्याण पश्चिमेतून एकसंध शिवसेना होती तेव्हापासून विजय साळवी, दिवंगत राजेंद्र देवळेकर, शहरप्रमुख रवी पाटील, सचिन बासरे, दिवंगत प्रकाश पेणकर, जिल्हाध्यक्ष अरविंद मोरे विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असायचे. या सगळ्या इच्छुकांना मातोश्रीवर एकत्रित करून मग त्यांच्या समोरच समझोत्याचा उमेदवार म्हणून एका उमेदवाराचे नाव पुढे यायचे. अशाच समझोत्यामधून पाच वर्षापूर्वी शहरप्रमुख विश्वनाथ भोईर यांचे नाव कोणाही शिवसैनिकाच्या मनात नसताना उमेदवार म्हणून पुढे आले. सर्वांनी एक ताकदीने प्रचार करून भोईर यांना ५ वर्षापूर्वी निवडून आणले.

## शिर्डी मतदारसंघातून राधाकृष्ण विखे पाटील यांचा दणदणीत विजय



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, राहाता (अहिल्यानगर) :** राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपला करिष्मा कायम ठेवला आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघातून सलग सातव्यांदा दमदार विजय मिळवून ते विधानसभेत गेले आहेत. शिर्डी मतदारसंघात महायुतीकडून राधाकृष्ण विखे पाटील तर महाविकास आघाडीकडून प्रभावती घोगरे रिंगणात होत्या. तर राजेंद्र पिपाडा यांनी अपक्ष निवडणूक लढवली. तिरंगी लढतीत राधाकृष्ण विखे यांनी दोन्ही उमेदवारांना धूळ चारत पुन्हा एकदा आपला गड कायम राखला आहे. दरम्यान विजयानंतर प्रतिक्रिया देताना विखे पाटील म्हणाले, माझा विजय शिर्डी मतदारसंघातील जनतेला समर्पित आहेत. डॉ. सुजय विखे पाटील यांनी माझ्यासाठी खूप मेहनत घेतली. खरेतर महायुतीचे सरकार बनण्यामागे लाडक्या बहिणींचा मोठा हात आहे. आमचे नेते देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत, अशी आमची इच्छा आहे.